# बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय

## प्रेसनोट

दिनांक १६/०९/२०२४

---

दिनांक १७/०९/२०२४ रोजी अनंत चतुर्थी गणपती विसर्जन व दिनांक १८/०९/२०२४ रोजी ईद-ए-मिलाद सणानिमित्त मिरवणूक काढण्यात येणार आहे. गणेशोत्सव विसर्जन व ईद-ए-मिलाद मिरवणूक निमित्त मोठया प्रमाणात भाविक मिरवणूकांमध्ये सहभागी होतात.

दिनांक १७/०९/२०२४ रोजी अनंत चतुर्थी गणपती विसर्जन व दिनांक १८/०९/२०२४ रोजी ईद-ए-मिलाद निमित्त मिरवणूकांकरीता बृहन्मुंबई शहरात कायदा व सुव्यवस्था राखणेकामी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा. विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या मार्गदर्शनानुसार मा. पोलीस सह आयुक्त (का.व सु.), बृहन्मुंबई ह्यांचे देखरेखीखाली बंदोबस्ताचे नियोजन करण्यात आलेले आहे.

नागरिकांना अनंत चतुर्थी गणपती विसर्जन व ईद-ए-मिलाद सणानिमित्त मिरवणूका सुरक्षितपणे व निर्विघ्नपणे साजरा करता यावा याकरीता मुंबई पोलीस दलाकडून वाहतुक विभागासह किमान **०९ अपर पोलीस आयुक्त, ४० पोलीस उप आयुक्त, ५६ सहायक पोलीस आयुक्त यांच्यासह ४०१३ पोलीस अधिकारी व २०५१० पोलीस अंमलदार,** बंदोबस्तकामी तैनात करण्यात आलेले आहेत. त्यांचेसोबत महत्वाच्या ठिकाणी एस.आर.पी. एफ. प्लाटून, जलद प्रतिसाद पथक (क्युआरटी), दंगल नियंत्रण पथक, डेल्टा, कॉम्बॅक्ट, होमगार्डस्, महाराष्ट्र सुरक्षा बल व इतर अशा चोख पोलीस बंदोबस्ताचे नियोजन करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे अनंत चतुर्थी गणपती विसर्जन व ईद-ए-मिलाद सणानिमित्त मिरवणूका बंदोबस्तातील कर्तव्य बजावणारे अधिकारी व अंमलदार यांचेकरीता यावर्षी नाविन्यपुर्ण कल्याणकारी योजना देखील राबविण्यात येत आहे.

बृहन्मुंबई पोलीस दलातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, गणेशोत्सव विसर्जन व ईद-ए-मिलाद निमित्त मिरवणूकांदरम्यान गर्दीच्या ठिकाणी संयम दाखवून पोलीसांना सहकार्य करावे, बेवारस वस्तू आढळल्यास पोलीसांना त्याबाबत तात्काळ माहिती दयावी, सर्व नागरिकांनी नियमांचे भान ठेवून गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद सण उत्साहाने व जल्लोषात साजरे करावे. आवश्यक प्रसंगी नागरीकांनी तात्काळ पोलीस मदतीसाठी पोलीस हेल्पलाईन १००, ११२ येथे संपर्क साधावा.

****